# महाराष्ट्र शासन

क्र.निआ/आस्था/२४९/२०२१/ 3870

निवासी आयुक्त यांचे कार्यालय,
महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग,
नवी दिल्ली - ११०००१.
दिनांक : 28 SEP 2021

प्रति,

श्रीमती रंजना उ. कुमरे,
कक्ष अधिकारी (२०-अ),
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

**विषय: नागरीकांची सनद तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत.**

**संदर्भ: आपले पत्र क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१३०/२०अ, दि. १७.०९.२०२१.**

संदर्भाकिंत विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, निवासी आयुक्त कार्यालयाची सुधारित नागरीकांची सनद आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात आलेले आहे.

**( डॉ. राजेश अडपावार )**
**सहाय्यक निवासी आयुक्त (प्रशासन)**

सोबत : वरीलप्रमाणे.

निवासी आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग,
नवी दिल्ली- ११०००१

# नागरिकांची सनद

संकेतस्थळ: www.maharashtra.maharashtrasadan.gov.in
ई-मेल: mahasadan@gmail.com

दुरध्वनी क्र.: ०११-२३३८७२८४, २३३८७२८५/६/७/९
फॅक्स क्र.: ०११-२३७८२८०४

# नागरिकांची सनद

**प्रस्तावना:**

संघीय गणतांत्रिक व्यवस्थेत केंद्र आणि राज्य शासन व इतर राज्य शासन यांच्याशी सुसंवाद ठेवणे, आंतरराष्ट्रीय संबंध जोपासणे, राज्यात गुंतवणुकीस प्रोत्साहन देणे तसेच राजशिष्टाचाराची कामे पार पाडणे या सर्व व्यवस्थकरिता भारताची राजधानी नवी दिल्ली येथे राज्य शासनाच्या पायाभूत संरचनेत निवासी आयुक्तालस हे अग्रणी कार्यालय आहे. सदर मौलिक उद्देश पूर्ण करण्याच्या दिशेने सन १९६३ सालापासून नवी दिल्ली येथील सांगली प्लॉटवर आधी “महाराष्ट्र हाऊस” व नंतर “महाराष्ट्र सदन” या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वास्तुमध्ये ही प्रमुख राजशिष्टाचारीय व्यवस्था कार्यरत आहे. राज्याच्या या उदात्त व्यवस्थेमध्ये योगदान देणाऱ्या अभ्यागतांचा नवी दिल्ली येथील मुक्काम सुखकर व्हावा या उद्देशाने राज्य शासनाने नवी दिल्ली येथील कस्तुरबा गांधी मार्गावर अत्याधुनिक सुखसुविधांनी युक्त असे दुसरे राज्य अतिथीगृह (नवीन महाराष्ट्र सदन) बांधले असून ते दिनांक १५ ऑगस्ट, २०१३ पासून वापरासाठी खुले करण्यात आले आहे.

**निवासी आयुक्त कार्यालयाची रचना:**

महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापन करण्याकरिता निवासी आयुक्त यांच्या अधिपत्याखाली प्रशासन शाखा, लेखा शाखा, संपर्क शाखा, माहिती व तंत्रज्ञान शाखा, सुरक्षा शाखा आणि दोन्ही महाराष्ट्र सदनाचे आरक्षणासंबंधित दैनंदिन कामकाज संभाळण्याकरिता व्यवस्थापक कार्यालय कार्यरत आहेत. या सर्व शाखांच्या संबंधित असलेल्या नस्त्या अपर निवासी आयुक्त यांच्यामार्फत सादर केल्या जातात. उक्त सर्व शाखांमध्ये निवासी आयुक्त कार्यालयातील कामाच्या विषयांची विभागणी करण्यात आलेली आहे. याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-१** मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

निवासी आयुक्त कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचे वेळापत्रक **परिशिष्ट-२** येथे सादर करण्यात आले आहे.

**गाऱ्हाणी व तक्रारी यांचे निराकरण:**

नागरिकांची काही गाऱ्हाणी/ तक्रारी असल्यास यासंबंधी परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदविता येईल. गाऱ्हाणी/ तक्रारी समक्ष भेटीने/ पत्राने तथा ई-मेलद्वारे मांडता येतील.


नागरिकांच्या सनदेचा आढावा दरवर्षी २ मे रोजी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

**जनसामान्यांच्या सूचना:**

निवासी आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील सेवा कार्यभावनेने व कार्यतत्परतेने पुरविण्याची हमी देत आहे. या सर्व सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी/ कर्मचाऱ्यांची राहील.

परिशिष्ट-१

## निवासी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली कार्यालयाची संरचना



# परिशिष्ट- २

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. | **व्यवस्थापक कार्यलय:-** | | | | | |
| १. | महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली येथे येणाऱ्या अतिथींना शासन निर्णय क्र. आरक्षण-११९९/प्र.क्र.८/ ९९/२०-अ, दिनांक १६.०७. १९९९ आणि क्र. निआ/ व्यमस/ कक्षबंधभाडे/ २०१०/१०५५, दि. २९.०७.२०१० नुसार सदनात कक्ष आरक्षण करण्यात येते | श्रीमती भागवंती मेश्राम, व्यवस्थापक, महाराष्ट्र सदन Email ID- mahasadan@ gmail.com | अर्ज प्राप्त झाल्यापासून ०७ दिवस | डॉ. राजेश अडपावार, सहा. निवासी आयुक्त (राजशिष्टाचार) Email ID- arcprotocolmahasadan@ gmail.com | अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवस | डॉ. निरुपमा डांगे, अपर निवासी आयुक्त Email ID- arcmaharashtra@gmail.com |
| २. | महाराष्ट्र सदन, कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली येथे येणाऱ्या अतिथींना शासन निर्णय क्र. सदन २४१५/२४८/प्र.क्र.४२/२०-अ, दि. ०१.०९.२०१५ नुसार सदनात कक्ष आरक्षण करण्यात येते. | | | | | |
| ब. | **प्रशासन शाखा:-** या शाखेचा जनतेशी थेट संपर्क नाही. | | | | | |
| १. | निवासी आयुक्त कार्यालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या आस्थापनाविषयक बाबी. | श्री. रमेश सेमल्टी, वरिष्ठ सहाय्यक कक्ष अधिकारी, आस्थापना शाखा Email ID- arcestmahasadan@ gmail.com | अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवस | डॉ. राजेश अडपावार, सहाय्यक निवासी आयुक्त (प्रशासन) Email ID- arcestmahasadan@ gmail.com | अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवस | डॉ. निरुपमा डांगे, अपर निवासी आयुक्त Email ID- arcmaharashtra@gmail.com |

| अ.क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|---|
| क. | **लेखा शाखा:-**<br>या शाखेचा जनतेशी थेट संपर्क नाही. | श्री. निलेश केदारे, सहाय्यक लेखा अधिकारी<br>Email ID- arc.ddomaharashtra@gmail.com | अर्ज प्राप्त झाल्यापासून १५ दिवस | डॉ. राजेश अडपावार, सहाय्यक निवासी आयुक्त (संपर्क) तथा आहरण व संवितरण अधिकारी<br>Email ID- arc.ddomaharashtra@gmail.com | अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवस | डॉ. निरुपमा डांगे, अपर निवासी आयुक्त<br>Email ID- arcmaharashtra@gmail.com |
| १. | निवासी आयुक्त कार्यालयातील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा/ लेखा विषयक सर्व बाबी हाताळणे. | | | | | |
| २. | कार्यालयाचे वेतन व भत्ते अदा करणे. | | | | | |
| ३. | कर्मचाऱ्यांच्या व्यक्तीगत स्वरुपाच्या आर्थिक मागण्या मंजूर करणे व त्याबाबतची देयके तयार करुन त्यांचे प्रदान संबंधितांना करणे. | | | | | |
| ४. | सेवा/ साहित्य पुरवठादार/ ठेकेदार यांच्या देयकांचे प्रदान करणे. | | | | | |